# आई

मुंबईच्या शीव भागातील नगरपालिकेच्या इस्पितळात दहा- अकरा वर्षांची एक मुलगी कॉटवर एकटीच पडून होती. नोकरीवर जाणाऱ्या वडील भावाने घरून आणलेला जेवणाचा डबा तिच्या कॉटजवळ ठेवला होता आणि तो कामावर गेला होता. वडील अर्धांगवायूने आजारी आणि आईला त्यांच्याजवळ राहणे भाग. त्यामुळे तिच्याजवळ कोणीच दुपारी राहू शकत नसे. रात्रीच्या वेळी भाऊ झोपायला मात्र येई. पायाच्या हाडाला झालेल्या दुखापतीमुळे इस्पितळात राहावे लागलेल्या कमलला दुपार खायला उठे; पण काहीच इलाज नव्हता.

भावाला- काशीनाथला नव्यानेच मुंबईत नोकरी मिळाल्यामुळे आई-वडिलांना आणि धाकट्या बहिणीला घेऊन तो मुंबईत आला होता. काशीनाथची वडील बहीण गोदावरी मुंबईतच दिली होती. ती जवळ माटुंग्यालाच असे; पण ती नुकतीच बाळंतपणात वारली होती. कुटुंब नव्यानेच मुंबईत आलेले असल्यामुळे इतर कोणाशी फारसा परिचय झालेला नव्हता. नाशिकजवळच्या सिंदखेड गावचे कुलकर्णीपण त्यांच्या घरात होते; पण शंकररावांनी बऱ्याच वर्षांपासून ते सोडून दिले होते. आता मुलाने तर कुलकर्णी हे आडनावसुद्धा टाकून देऊन शृंगारपुतळे हे कुटुंबाचे अगदी जुने आडनाव शोधून काढून वापरायला सुरुवात केली होती. अनेक दिवसांपासून अर्धांगवायूने आजारी असलेल्या शंकररावांना मुलाने मुंबईत आणले होते. एक-दोन डॉक्टरांना दाखवून झाले होते, परंतु अर्धांगवायू बरा होण्याची फारशी आशा नाही असे डॉक्टरांनी सांगितले होते. उपचार करून पाहणे मात्र चालू होते.

कॉटवर पडल्या पडल्या कमल आपले बालपण आठवत होती. अगदी लहानपण गेलेले सिंदखेड तिला फारसे आठवत नव्हते. मुंबईतल्याच वास्तव्याच्या तीन-चार वर्षाभोवती तिच्या आठवणी गुंतलेल्या होत्या. दहा- पंधरा दिवस झाले आणि एकदाची डॉक्टरांनी सुटी दिली. कमल दादरला घरी परत गेली. काही दिवसांनंतर वडील आणि पाठोपाठ आई असे दोघेही मुंबईत असतानाच गेले आणि कमलला तिचे शिक्षण चालू राहावे म्हणून आत्याकडे नागपूरला पाठवायचे काशीनाथने- भय्यासाहेबांनी- ठरवले. कमलची रवानगी नागपूरला झाली व ते एकटेच मुंबईत राहू लागले.

कमलची एक आत्या नागपूरला लोणकरांकडे दिली होती. एका काळी लोणकरांची स्थिती चांगली होती; पण ते वारल्यानंतर कुटुंबाची परिस्थिती एकदमच बदलली. उत्पन्नाचे काही साधनच उरले नाही. कुशाआत्या त्यांच्या मुलीला घेऊन नागपूरला महालात गाडगिळांच्या गाडीखान्यासमोर छोट्याशा जागेत राहू लागल्या. काही आधार नसल्यामुळे कुशाआत्या गाडगिळांच्या घरी स्वयंपाक करी. सणावारी गाडगिळबाईंच्या मदतीलाही जाई. कुशाआत्याने कमलला शाळेत घातले आणि तिचे शिक्षण पुन्हा चालू झाले. त्यावेळी नागपुरात वातावरण मोठे भारलेले होते. गांधाजींची चळवळ सुरू झाली होती. जोगळेकर नावाच्या सोवळ्या झालेल्या एक विधवाबाई प्रभातफेऱ्या काढायच्या. हातात कॉंग्रेसचा झेंडा घेऊन गाणी म्हणत निघणाऱ्या या प्रभातफेऱ्यांत पन्नास-साठ मुली असायच्या; त्यात कमल आणि तिची आतेबहीणही असत. कमलचे पाठांतर चांगले, त्यामुळे प्रभातफेरीत म्हणावयाची गाणी तिची ताबडतोब पाठ होत. जोगळेकरमावशी कधी कधी मुलींना दारूच्या दुकानासमोर पिकेटिंग करायलाही नेत. लोणकरांचा कोणी लांबचा नातेवाईक सरकारी नोकरीत होता. त्याला या मुली कॉंग्रेसच्या प्रभातफेऱ्यांत भाग घेतात याची भलतीच काळजी वाटू लागली व त्याने कुशाआत्याला सांगून दोघींचे प्रभातफेरीत जाणे बंद करावयास लावले. नागपूरला, बहुधा पटवर्धन हायस्कुलात, कमल सहावीची परीक्षा पास झाली.

या दरम्यान भय्यासाहेबांची मुंबईची नोकरी सुटली होती. दुसऱ्या नोकरीचा शोध चालू होता. विदर्भात वनखात्यात हिशेब कारकुनाची नोकरी मिळू शकेल असे कळाल्यावरून भय्यासाहेब स्वत: चांद्याला गेले आणि तेथे त्यांना नोकरी लागलीही. हल्लीच्या चंद्रपूरला त्यावेळी चांदा नावाने ओळखले जाई. एक छोटेसे कौलारू पण

टुमदार घर त्यांना भाड्याने मिळाले. घरासमोर मोठी मोकळी जागाही होती. काही दिवसाने तेथे बॅडमिंटनचा खेळ सुरू झाला. भय्यासाहेबांचे मित्र खेळत नसतील तेव्हा कधीमधी कमल आणि तिच्या मैत्रिणींनाही थोडेफार खेळता येऊ लागले.

कमलला शाळेत घालावयाचे होते. भय्यासाहेबांनी चौकशी केली तेव्हा मुलींची वेगळी माध्यमिक शाळाच चांद्यात नसल्याचे कळाले. ज्युबिली हायस्कूल नावाने ओळखले जाणारे सरकारी हायस्कूल होते; पण त्यात मुले आणि मुली एकत्र शिकत. सहशिक्षण असलेल्या शाळेत कमलला प्रवेश देण्यास भय्यासाहेबांनी नकार दिला. 'मुलींची वेगळी शाळा असती तर मी तुला शिकवले असते' असे ते म्हणाले. शिक्षण थांबले म्हणून कमल खूपच नाराज झाली. पण भय्यासाहेबांना कोण सांगणार?

शाळेचा अभ्यास नसला तरी घरी मिळेल ते पुस्तक कमल वाचून काढू लागली. भय्यासाहेबांनाही वाचनाची आवड होती त्यामुळे ते वाचनालयातील पुस्तके आणायचे. शिवाय शाळेत झालेली इंग्रजीची ओळख पुसट होऊ नये म्हणून सापडेल ते छापलेले इंग्रजी वाचायचा प्रयत्न ती करायची. त्याच काळात चांद्यात महात्मा गांधी आले. प्रभातफेऱ्या कमलच्या मनात अद्याप जाग्या होत्या. सगळे गाव गांधींना पाहायला आणि ऐकायला गेले. कमलही मैत्रिणींबरोबर गेली होती. गांधीजी काय म्हणाले, हे कमलला फारसे कळले नाही. पण काही तरी महत्त्वाचे आपल्या आयुष्यात घडले आहे असे त्यांच्या दर्शनाने तिला वाटले. त्या दिवसापासून काही तरी नेम करावयाचा म्हणून तिने चहा सोडून दिला. आयुष्यातली पुढची पन्नास-साठ वर्षे तिने चहाला स्पर्शही केला नाही.

शिक्षण थांबलेले आणि वयही सोळा-सतरा झालेले. त्यामुळे भय्यासाहेबांनी कमलच्या लग्नाचा विचार करून तिला स्थळे पाहण्याला सुरुवात केली. कमल गोरीपान, नाकीडोळी नीटस. समोरचे दोन दात दिसतील न दिसतील एवढेच किंचित पुढे येऊ पाहणारे. डोळ्यात थोडा धीटपणा. अशी कमल पसंत पडण्यात अडचण नव्हतीच. अडचण होती ती फक्त भय्यासाहेबांच्या आर्थिक परिस्थितीची. नवी नोकरी नुकतीच लागलेली. पूर्वीची शिल्लक फारशी नव्हतीच. मुंबईच्या मानाने चांद्यात आर्थिक परिस्थिती थोडीशी बरी मात्र झाली होती. कमलची एक आत्या जानकीरामपंत ताम्हण्यांना दिली होती. जानकीरामपंत औरंगाबादला सरकारी हायस्कुलात शिक्षक होते. त्यांचे बंधू उपेंद्रराव लॉ क्लासला हैदराबादला असताना त्यांच्याबरोबर असणारा बीडचा पुरुषोत्तम चपळगावकर त्यांचा मित्र झाला होता. वकील झालेल्या या मुलाचे स्थळ उपेंद्ररावांनी जानकीरामपंतांना सुचवले. जानकीरामपंतांनी ते भय्यासाहेबांना कळवले होते.

मुलगा सुस्वभावी आणि कर्तबगार असल्याची खात्री उपेंद्ररावांनी दिली होती. मात्र तो तिजवर होता. त्याच्या पहिल्या पत्नीचे धनुर्वाताने व दुसरीचे क्षयाने लग्नानंतर थोड्या थोड्या दिवसातच निधन झाले होते. एवढीच एक बाब डावी होती. पण त्याकडे दुर्लक्ष करून भय्यासाहेबांनी स्थळाचा विचार करण्याचे ठरवले. मुलगा हैदराबादहून सरळ रेल्वेने बल्लारशाह मार्गे चांद्याला आला आणि मुलगी पाहून गेला. वीस-बावीस वर्षांचा मुलगा काळासावळा असला तरी तरतरीत होता. मुलाने परत गेल्यावर आपली संमती कळवली. कमलनेही अनुमती दिल्यावर भय्यासाहेब मुलाचे घर पाहण्यासाठी बीडला जाऊन आले आणि नंतर लग्न निश्चित झाले.

देण्याघेण्याचा प्रश्न कोणीच काढला नव्हता. लग्न चांद्याला व्हायचे होते. लग्नाच्या आदल्या दिवशी नवरा मुलगा, त्याचा धाकटा भाऊ आणि त्याची आई असे तीन माणसांचे वऱ्हाड चांद्याला पोहोचले. जाटपुऱ्यातल्या एका देवळात लग्न लागले. भय्यासाहेब वनखात्यात असल्यामुळे व चांद्यातील आर्थिक जीवन वनाशी संबंधित असल्यामुळे लग्नाला बरीच मंडळी हजर होती. चांद्यात तेव्हा मोटारी फारच कमी. वरात मोटारीतून निघावी असे भय्यासाहेबांना वाटले. त्यांनी शेजारीच राहणाऱ्या पुंडलिक वकिलांची मोटार मागितली आणि वरात मोटारीतून निघाली.

बस बीडला पोहोचली तेव्हा सायंकाळ झाली होती. बीडमध्ये वीज नव्हती. गाव आपले दिवसभराचे व्यवहार आवरू लागले होते. जालन्याहून दररोज एकच बस बीडला येई. ती आल्याचा निरोप वाड्यात गेला तेव्हा रावसाहेबांनी- कमलच्या चुलतसासऱ्यांनी बसस्टॅण्डजवळच्याच मारुतीच्या देवळातच सर्वांना थांबायला सांगितले. पाच-सहा बत्त्या, एक तांगा आणि वाजंत्री त्यांनी पाठवली. तांग्यात नवरा-बायको बसले आणि वरात गावात निघाली. रस्त्यातच कोणीतरी काही निरोप दिला आणि कमल आणि पुरुषोत्तम यांना तांग्यातून खाली उतरवण्यात आले. नात्यातील कोणी बाई अडली होती. गावात बाळंतपणे करणारी एकच सुईण होती. तांगा पाठवल्याशिवाय ती यायला तयार नव्हती. तिच्यासाठी तांगा हवा होता. तिच्यासारखाच तांगासुद्धा गावात एकच होता. तिला तांगा पाठविण्यात आला आणि नवपरिणीत वधू-वर वाजंत्र्यांच्या मागे पायी चालत घरी आले.

कमल बीडला आली आणि 'रमा' झाली. धोंडापुऱ्यातला चपळगावकरांचा वाडा मोठा असला तरी वाड्याच्या दक्षिण-पश्चिम कोपऱ्यातला चार-चार खणाच्या दोन वडी असलेला छोटा भागच त्या कुटुंबाच्या वाट्याला आला होता. सासरे हयात नव्हते. सासू, नवरा आणि धाकटा दीर असे तिघे त्या घरात राहायचे. भिंती आणि जमीन दोन्ही मातीच्या. आठ-पंधरा दिवसांनी सगळे सारवून घ्यावे लागायचे. मजुरीण काहीवेळा मदतीला येत असली तरी बऱ्याचवेळा स्वत:ही सारवावे लागे. आतल्या वडीत स्वयंपाकघर. तेथे उजेड यायचा तो फक्त चुलीवरच्या धाऱ्यातून आणि थोडाफार आलाच तर स्वयंपाकघर आणि ओसरीच्या मधल्या दारातून. वाड्यातला आड मोठ्या दर्शनी दरवाज्याजवळ. आड समाईक असल्यामुळे त्यावर कोणी रहाट किंवा चाक लावलेले नव्हते. शेंदून पाणी काढावे लागे. आडावरून पाणी आणून ते घरात भरण्याच्या कामासाठी एक रुपया महिन्याचा एक माणूस पुढे काही दिवसांनी आला; पण धुणे मात्र आडावर जाऊनच धुवावे लागे.

नवऱ्याची वकिली नुकतीच सुरू झालेली होती. अद्याप जम बसावयाचा होता. धाकटा दीर- जनार्दन- औरंगाबादच्या इंटरमिजिएट कॉलेजमध्ये शिकत होता. थोडीफार जमीन होती ती कुळाला ठोक्याने (खंडाने) दिली होती. त्याशिवाय यायचे ते उत्पन्न म्हणजे एक-दोन गावाच्या कुलकर्णीपणाचा दरवर्षी येणारा पंधरा-सोळा रुपये रुसूम. त्यातच सगळे भागवयाचे. सासरे तेरा-चौदा वर्षांपूर्वीच वारले होते. तेव्हाच सासूबाई सोवळ्या झाल्या होत्या. तांबड्या अलवाणाखेरीज काही नेसत नव्हत्या. अंगावर सोने घालण्याचा तर प्रश्नच नव्हता. घरात होते ते सोने स्वयंपाकघराच्या मातीच्या भिंतीत लिंपून ठेवले होते. त्यातले थोडे थोडे मोडूनच त्यांनी आपल्या दोन्ही मुलांची- काका- बाबांची- शिक्षणे केली होती. मी वडलांना काका आणि चुलत्यांना बाबा म्हणे.

लग्नानंतर दोन वर्षांतच आईला एक मुलगी झाली. घरात आलेले पहिलेच अपत्य. त्यामुळे तिचे लाडही झाले. दुर्दैवाने ती एक वर्षाची असतानाच वारली. काकांची- माझ्या वडिलांची वकिली चांगली चालेल असे वाटत असतानाच हैदराबादेतील राजकीय वातावरण झपाट्याने बदलू लागले. आमच्या घरापासून जवळच राहणाऱ्या हसेगावकर वकिलाकडे आ.कृ. वाघमारे यायचे. ते आले म्हणजे काका त्यांना भेटायला जायचे. हैदराबाद संस्थानात राजकीय चळवळ सुरू करावी व त्यासाठी महाराष्ट्र संघ या नावाची एक संस्था काढावी असा वाघमाऱ्यांचा विचार होता. 1937 च्या जूनमध्ये परतूरला मराठवाड्यातले अनेक तरुण कार्यकर्ते एका परिषदेसाठी जमले. त्यात काकाही होते. राजकीय काम म्हणजे काय व त्यातून काय काय वाट्याला येऊ शकते याची पुसटशीही का होईना, आईलाही कल्पना होती. पण तिने कधी काकांना अडवण्याचा प्रयत्न केला नाही. तिनेच काय पण आजीनेही- मी त्यांना बाई म्हणे- काकांना विरोध केला नाही. परतूरहून परत आल्यावर काका महाराष्ट्र परिषदेच्या प्रचारासाठी निरनिराळ्या गावांना जाऊ लागले.

आई-काकांचे लग्न झाल्यानंतर दोन-तीन वर्षांतच रावसाहेबांचा (वडिलांचे चुलते) मृत्यू झाला. वाड्याचे चित्रच पालटून गेले. माणसांचा राबता एकदम कमी झाला. माझ्या चुलत्यांनी- बाबांनी- आपले शिक्षण थांबविले

आणि त्यांना महसूल खात्यात नोकरी लागली. दिवसभर घरात सासू- सूनच असायच्या. माझ्या आजींना सगळेच बाई म्हणत. आईही तसेच बाई म्हणू लागली.

आजोबांच्या माघारी सगळ्या अडचणींना तोंड देत घर व्यवस्थित सांभाळून बाईंनी मुलांना शिकविले, मार्गी लावले; मात्र सून आल्यावरही त्यांनी कधी रुबाब गाजवला नाही. तो त्यांचा स्वभावच नव्हता. आई घरात आल्यावर बाईंनी कामाची वाटणी करून घेतली. सकाळचा स्वयंपाक बाई करायच्या आणि संध्याकाळचा स्वयंपाक आईने करायचा. चूल-पोतेरे, कंदील-चिमण्या आई करी. सणवार सोडले तर घरात पदार्थ मोजकेच होत. कुळाचाराला होणारी पुरणपोळी सोडली तर मुलांच्या वाढदिवसाला किंवा कोणी पाहुणा आल्यास गोड पदार्थ होई तो म्हणजे सुधारस. त्यापेक्षा जास्त काही परवडणारेही नव्हते. नागझरीला शेतावर कधी ठोका किंवा बटईचा माल सरकत्याकडून आणायला जाण्याचा प्रसंग आला तर बाई जायच्या. बाईंचे माहेर केज तालुक्यातल्या सोनवळ्याचं. तिथं त्यांचे भाऊ शेती करीत. बाई आणि आई दोघींनाही एक एक भाऊ. तेवढाच फक्त माहेरचा धागा.

बीडमध्ये काशीराव वकिलाच्या वाड्याच्या बाहेरच्या भागात एक दुकान भाड्याने घेऊन काकांनी तेथे काँग्रेसचे कार्यालय सुरू केले. काँग्रेस ही निजाम सरकारने बंदी घातलेली संघटना होती. काका उघडपणे तिचे काम करीत असल्यामुळे त्यांना पोलिस कधीही पकडून घेऊन जाऊ शकतात याची काकांनी आईला कल्पना दिली होती. अशा वातावरणातच आई माझ्या जन्माची वाट पाहत होती. मी बाईंचा पहिलाच नातू. त्यामुळे घरात आनंदाचे वातावरण होते. बाई तर खूपच खुश होत्या. मुलगा जन्मला म्हणून वाड्यात काम करणाऱ्या बायांनी हेले घातले; म्हणजे घागरींनी दहा दिवस वाड्याच्या उंबऱ्यावर पाणी ओतले आणि रोज नवे तोरण लावले.

मी चार- पाच महिन्यांचा असतानाच बाबांचे- माझ्या चुलत्यांचे- लग्न ठरले. लग्न अंबडला होते. मी तान्हा असल्यामुळे आई लग्नाला गेलेली नव्हती. काका लग्नाहून परत आले आणि आमच्या घराची झडती झाली. पोलिसांनीच घरात आणून टाकलेले एक पत्रक सापडले म्हणून पंचनामा करून काकांना पोलिस घेऊन गेले. काकांना सहा महिन्याची शिक्षा झाली आणि नंतर त्यांची औरंगाबादच्या हर्सूल तुरुंगात रवानगी झाली. राजकीय चळवळ, तुरुंग आणि उरलेल्या वेळात वकिली हा पुढची दहा वर्षे चालेला काकांचा दिनक्रम थोड्याच दिवसात आईच्या अंगवळणी पडला.

चांद्याची नोकरी सुटल्यावर भय्यासाहेब नाशिकला गोठीशेटजींकडे नोकरी करू लागले. डेअरी, एक फाऊंड्री असे गोठींचे अनेक उद्योग होते. गरजेप्रमाणे मामा त्या त्या ठिकाणी व्यवस्थापक म्हणून काम करीत. वर्षा दोन वर्षांनी आम्हा मुलापैकी एखाद्याला बरोबर घेऊन आई नाशिकला माहेरी जायची. मामा, मामी आणि त्यांची मुलगी शकू यांच्या भेटी व्हायच्या. महिना-दीड महिना राहायचे आणि मग आम्हाला परत न्यायला बाबा यायचे.

काका औरंगाबादच्या हर्सूल तुरुंगात असताना तीन-चार महिन्यानंतर आई आणि मी त्यांच्या भेटीला जात असू. आशाताई वाघमारे भेटीची परवानगी वगैरे काढून द्यायच्या. काका तुरुंगातही प्रसन्न असत. आईने कधीही आपल्या भावनांना बाहेर सहसा प्रगट होऊ दिले नाही. शांतपणे ती काकांशी बोले आणि आम्ही परत निघत असू.

माझी पहिली काकी लग्न झाल्यानंतर थोडे दिवसच बीडला होती. चुलत्यांची बदली माजलगावला झाली व ते दोघे तिकडे गेले. दोन मुले झाल्यावर कॉलऱ्याने तिचा अंत झाला. तिच्याच धाकट्या बहिणीशी बाबांचे - माझ्या चुलत्यांचे दुसरे लग्न झाले. तिलाही दोन मुले झाल्यावर दुर्दैवाने बीडला आलेल्या प्लेगच्या शेवटच्या फेऱ्याने तिचा घास घेतला. आम्हा तीन भावंडाप्रमाणेच चुलत्यांची मुलेही माझ्या आईलाच आई म्हणू लागली. आमच्याबरोबरच वाढू लागली. आम्हा सख्ख्या आणि चुलतभावंडांच्या जोडीला वयाने आमच्यापेक्षा बरेच मोठे असलेले आमचे एक मावसकाकाही शिक्षणासाठी आमच्या घरी राहत. काका राजकीय काम करू लागल्यानंतर महाराष्ट्र परिषदेचा एखादा पूर्णवेळ कार्यकर्ताही आमच्याकडे जेवायला असे. तशात मीही आईच्या त्रासात जमेल तशी भर टाकत

होतो. रात्री सर्वांबरोबर जेवायचे नाही आणि सगळे झोपले म्हणजे अकरा-बारा वाजता मला भूक लागली म्हणून आईला उठवायचे. आईला होणारा हा रोजचा त्रास पाहून बाईंनी एक उपाय सांगितला. थोडा दूध-भात कालवून एका बुटकुल्यात आई तो माझ्या उशाशी ठेवू लागली.

माझ्या दुसऱ्या काकींच्या मृत्यूनंतर बाबांनी- माझ्या चुलत्यांनी- पुन्हा लग्न करायला नकार दिला होता. प्रौढ अविवाहित मुली त्याकाळी सापडणे अवघड होते. पण 27-28 वर्षांच्या अशा एका मुलीचे स्थळ सुचविले गेले तेव्हा बाईंनी आग्रह करून बाबांना लग्नासाठी तयार केले. तिसऱ्या काकी आमच्या घरी आल्या. त्यांचे माहेर गावातच होते. थोडे दिवस गेले आणि नंतर काकींनी सारखे माहेरी जाऊन तिकडेच जास्त काळ राहणे सुरू केले. बाईंना यामुळे काळजी वाटू लागली. त्यांनी कारणाचा अंदाज बांधला आणि बाबांना सांगितले 'तिला विचार, तिला वेगळे राहायचे आहे काय? तशी तिची इच्छा असेल तर तू येथेच अर्ध्या भागात वेगळा राहा.' चुलते आमच्या जुन्या भागात राहू लागले आणि बळवंतरावदादांच्या आम्ही विकत घेतलेल्या हिश्यात आम्ही राहू लागलो. नव्या काकी आल्या तरी चुलतभावंडांची आईवरची जबाबदारी संपली मात्र नाही. त्या मुलांसाठी तिचे मन तुटतच राहिले. माझ्या चुलत बहिणीचे- विजूचे लग्न झाले. माझ्या सख्ख्या बहिणीसारखेच डोहाळ जेवण, चांदण्याची साडी, अंधाराची साडी असे सगळे कौतुक तिचेही झाले. विजूचे बाळंतपण माझ्याच्याने होणार नाही असे काकींनी स्पष्ट सांगितल्यामुळे आईने ते आमच्या बंगल्यावर केले.

लौकिकदृष्ट्या जी नाती इतरांना महत्त्वाची वाटत नाहीत अगर ती आता शिल्लक नाहीत असे वाटते तीही आईच्या मनात जागी असत. आईच्या लग्नाअगोदर माझ्या वडलांच्या दोन पत्नी निवर्तल्या होत्या. त्यांचे स्मरण अहेवनवमीला रीतसर होतच असे. पण आईच्यादृष्टीने तो फक्त उपचार नव्हता. पाथरवाल्याचे कुलकर्णी आणि गेवराईचे चिंचोलीकर या काकांच्या पूर्वीच्या दोन सासुरवाड्या. ती घरे आपले माहेरच आहेत असे ती मानी. माझे सावत्र मामा किंवा मामी आले म्हणजे आमच्या घरी आई त्यांचे विशेष स्वागत करी. लग्नकार्यात त्यांच्याकडे आवर्जून जाई. जणू काही आईच्या रूपाने त्यांच्या मुली अद्याप हयात होत्या. माझ्या मुलाने- श्रीधरने- त्याच्या एका मैत्रिणीशी लग्न केले. ती मराठा जातीतील आहे. हे लग्न त्याने फक्त चार-दोन मित्रांच्या उपस्थितीत एका देवळात उरकून घेतले. नातसुनेचे आईने घरात स्वागत तर केलेच; पण तिला आम्ही स्वीकारले आहे हे इतरांना कळावे म्हणून तिने माझ्या पुतण्याच्या- बुद्धिराजच्या- साखरपुड्याच्यावेळी मुद्दाम श्रीधरच्या बायकोला जमलेल्या सगळ्या बायकांसमक्ष सोन्याच्या बांगड्या दिल्या. सोने महत्त्वाचे नव्हते, ती आमच्या घरात सून म्हणून मान्य आहे हे लोकांना सांगणे हा हेतू तिच्या मनात असला पाहिजे.

माझा सगळ्यात धाकटा चुलतभाऊ सुभाष याच्या मुलाच्या लग्नाच्यावेळी तब्येत बरी नसतानाही व जिना चढणे खूपच त्रासदायक असतानाही ती मुद्दाम हजर राहिली. आईविना लहानपण घालवलेल्या सुभाषची ती काही काळ आई झाली होती. हरिभाऊ देशमाने नावाचे एक गृहस्थ मला माझ्या कार्यालयीन कामात मदत करतात. ते रोज नियमित माझ्या घरी येतात. शेवटच्या तीन-चार वर्षांत देशमानेंना ती हक्काने आपली किरकोळ कामे सांगत असे. बाजारातून आणावयाची तिची औषधे ती मला आणायला सांगायची नाही, ती सांगायची देशमानेंना. त्यांना ती अरेतुरे तर म्हणेच; परंतु एखादेवेळी त्यांना यायला उशीर झाला तर 'तो अजून कसा आला नाही', असा तक्रारीचा सूरही काढी. पण त्याचबरोबर तो जेवला की नाही याचीही चौकशी करी. देशमानेच्या मुलीचे लग्न झाले तेव्हा तर तिला एक-दोन पायऱ्याही चढणे कठीण झाले होते. तरीही तिने येण्याचा आग्रह धरला. तिला अक्षरशः खुर्चीवर बसवून उचलून न्यावे लागले; ती आली. लग्न लागेपर्यंत थांबली. नवरा-नवरींना आहेर केला आणि मग घरी परत आली.

आपल्या कुटुंबाच्या सहवासात आलेल्या सगळ्याच माणसांवर आपला अधिकार आहे असे तिला वाटे. अर्थात त्यांच्यासाठी ती बरेच करीसुद्धा. बीडला दोन मुली आमच्या घरी घरकाम करीत. त्यातल्या एकीचे लग्न औरंगाबादेत झाले. ती मुलगी अधूनमधून आईला भेटायला येई. आईने एकदा तिला सहज विचारले "तुझा नवरा दारू पितो का?" तिने सरळपणाने 'हो' म्हणून उत्तर दिले. एकदा तो बायकोबरोबर आला असताना आईने त्याला आत बोलावले आणि "दारू पित जाऊ नकोस, त्याने घरादाराचा नाश होतो, तब्येत बिघडते" असे त्याचे बौद्धिक घेतले. काय परिणाम झाला माहीत नाही पण आईला आपले कर्तव्य केल्याचे समाधान झाले. बीडला आमच्या घरी बालराज नावाचा एक तेलगू मिस्त्री येत असे. काकावर त्याची भक्ती. त्याने आमच्या बंगल्याचे बरेचसे काम केले होते. स्वभावाने गरीब आणि कामात सफाई असलेला हा मिस्त्री काम नसले म्हणजे आमच्या व्हंरड्यात येऊन पडून राही. काही वेळा तो शिंदी वगैरे काही पिऊन आलेला असे. बोलत काहीच नसे; गप्प पडून राही. आईच्या लक्षात येई आणि ती त्याला सांगे "बालराज, आत ओसरीवर ये. तिथे ताक ठेवले आहे, ते पी." काही आंबट प्याले म्हणजे नशा उतरते असे तिला कोणीतरी सांगितले असावे.

आईचे लग्नापूर्वीचे मुंबई-नागपूर- चांद्याचे वास्तव्य हे तिचे एक वेगळेच व्यक्तित्व घडविणारे होते. मराठवाड्यातील तिच्या समवयस्क स्त्रियांपेक्षा तिच्या आवडीनिवडीही वेगळ्या होत्या. स्वयंपाक आणि भाज्या यात वेगळेपणा तर असायचाच; पण तिची वाचनाची आवड आणि नाटक, संगीत आणि मराठी चित्रपट यांच्यातील रस त्याकाळात सामान्यत: इतर प्रौढ मध्यमवर्गीय स्त्रियांत दिसत नसे. तिने एक-दोनदा ऐकलेले राम मराठ्यांचे गाणे, मालती पांडे आणि माणिक वर्मा यांनी गायिलेली भावगीते, तिने पाहिलेली बालगंधर्वांची आणि मास्तर कृष्णरावांची नाटके या तिच्या मनात जपलेल्या खास आठवणी असत. ऐकू येत होते तोपर्यंत तिला नाट्यसंगीत ऐकावेसे वाटे. हळूहळू ऐकू येणे कमी होऊ लागले तेव्हा मी हेडफोन लावून ध्वनीफितीवरील गाणी तिला ऐकवण्याचा प्रयत्नही केला. गाण्याच्या चालीपैकी एखादा तुकडा जरी नीट ऐकू आला तरी ती गाण्याचा मुखडा गुणगुणू लागे. तिला आवाज नव्हता, पण गाण्याची आवड मात्र होती. अगदी आकाशच्या- माझ्या नातवाच्या- बारशाच्या वेळी, आपल्या वयाच्या एक्याण्णव्या वर्षी तिने पाळणा म्हटला. बीडला नाटक कंपन्या क्वचित यायच्या. पण अशी एखादी कंपनी आली किंवा स्थानिक हौशी मंडळींनी एखादे नाटक बसवले तर आई आवर्जून जायची. सुहासिनी मुळगावकरांचे एकपात्री 'सौभद्र' पाहण्यासाठी ती बीडहून मुद्दाम औरंगाबादला आली होती. एकदा वाचनालयाच्या चालकांनी त्यांच्या एका कार्यक्रमात आईने भाषण करावे अशी इच्छा व्यक्त केली. ती तयार होईल की नाही याबद्दल सर्वांनाच शंका होती. खरे म्हणजे लग्न झाल्यानंतर पन्नास वर्षांत तिने भाषण केलेलेच नव्हते. तिने भाषण लिहून काढले आणि ते व्यवस्थित वाचून दाखवले. घरी आल्यावर मेघना तिच्या अभिनंदनपर काही बोलली तेव्हा ती म्हणाली, "त्यात काय होते मोठेसे? लिहून काढलेले तर वाचायचे होते."

दूरचित्रवाणी सुरू झाल्यानंतर काही मराठी मालिका सादर होऊ लागल्या. त्यापैकी एक-दोन ती आवडीने पाही. त्यांच्या प्रक्षेपणाचे वार आणि वेळाही तिच्या लक्षात असत. ऐकू काहीच येत नसे. पण मूकपटाप्रमाणे अंदाजाने त्या मालिकेचे कथानक ती मनाशी जुळवे. मालिका पाहताना तिच्या शेजारी आमच्या घरात काम करणाऱ्या मामी असत. त्यांचे इतर काम त्या काळात स्थगित असे. त्याही मालिका पहात आणि आईला हवी ती माहिती पुरवीत.

आईच्या श्रवणदोषावर उपचार म्हणून काकांनी एका प्रसिद्ध वैद्याने सांगितलेले एक तेल आणले होते. ते कानाला चोळायचे असा सल्ला होता. दर आठ-दहा दिवसांनी तेल चोळण्याचा काय परिणाम झाला हे पाहायची काकांना इच्छा होई. हॉलमध्ये मोठी चटई अंथरुन एका टोकाला काका बसायचे आणि दुसऱ्याला आई. काका

अगदी हळू आवाजात बोलायचे व त्यातले आईला किती ऐकू गेले हे पाहायचे. आईला ऐकू येण्यात फारसा फरक झाला नाही; पण हा श्रवणक्षमता मोजण्याचा अभिनव प्रकार मेघनासाठी थट्टेचा आणि करमणुकीचा विषय असे.

आणखी एका बाबतीत तिच्या बालपणाने तिच्यावर संस्कार केले असावेत. पराकाष्ठेची स्वच्छता तिला लागे. नीट न धुतलेले कपडे तिला चालायचे नाहीत. स्वयंपाकघर तर दिवसातून दोन वेळा धुतले जाई. एकदा मेघनाने भाजी चिरल्यावर ती न धुता फोडणीला टाकली. आई दुरुन बघत होतीच. ती तिला रागावली. 'भाजी धुवावी हेसुद्धा तुम्हाला कळू नये का ग? आम्ही न शिकलेल्याच बऱ्या.' असे ती म्हणाली. खरकटे हात तुपाच्या किंवा दुधाच्या भांड्याला लावलेले तिला चालायचे नाहीत. फुलपात्रात पाणी देताना कोणी त्यात बोट बुडवून फुलपात्र धरले असले तर ते पाणी टाकून देऊन ती दुसरे आणून द्यायची. पहिल्यापासूनच तिची अंगकाठी किरकोळ. अशक्त झालेली, पण कपड्याबद्दल टंगळमंगळ नसे. गबाळेपण तिला आवडत नसे. तिला रंगसंगतीचे चांगले ज्ञान होते. फक्त जीव हलका झाल्यामुळे जरीचे किंवा जाड पातळ तिला नको असे. दर उन्हाळ्यात दोन-तीन कॉटनच्या पातळ नऊवारी साड्या ती आणवून घेई. भडक रंगाचे कपडे तिला आवडत नसत. नटण्याची अजिबात आवड नसली तरी आपल्या अंगावर कोणता रंग खुलून दिसेल हे तिला कळत असे. तिच्या रंगसंगतीच्या सवयीची नाती थट्टा करीत व 'वा! मॅचिंग मॅचिंग आहे' असे म्हणत. तिने निवडलेले रंग मात्र सौम्य असत.

मुलींनी कोणते कपडे घालावेत याबद्दल मात्र तिचा काही आग्रह नसे. माझ्या मुलींनी जीन-टॉप घातले तरी तिची हरकत नसे. सुनेने सुटसुटीतपणासाठी पंजाबी ड्रेस घालावा अशी तिचीच सूचना असे. एकाच गोष्टीला तिचा विरोध असे तो म्हणजे मुलींनी केस कापण्याला. त्याबद्दल ती नापसंती दर्शवी; पण कोणावर फार रागवत मात्र नसे. मंगळसूत्र हा मात्र तिचा एक जिव्हाळ्याचा विषय होता. नंदिनीने-सुनेने मंगळसूत्र घातले नसले किंवा तिच्या गळ्यातल्या काळ्या पोतीत वाट्या नसल्या तर ती रागवायची. मला बोलावून घेऊन 'तिला आणखी एक मंगळसूत्र विकत आण' असे म्हणायची. मंगळसूत्रे घरात नव्हती असे नाही. ते एखादेवेळी घरी घातलेले नसे. आमच्या घरात काम करणाऱ्या मोलकरणी विवाहित असतील व त्यांच्या गळ्यात मंगळसूत्र नसेल तर माझ्या मुलीला बोलावून ती बाजारातून साधी मंगळसूत्रे विकत आणवून त्यांना देई.

नव्या आणि जुन्याचे एक फार गंमतीदार मिश्रण तिच्या व्यक्तिमत्त्वात होते. सायलीचे लग्न झाल्यावर माझा जावई निरंजन राजाध्यक्ष आमच्या घरी आला म्हणजे आई त्याच्याबरोबर जेवायला बसत नसे. जावयाच्या बरोबर कसं बसायचं ही अडचण. लग्नात राजाध्यक्षांनी काही मागितले तर नाहीच पण देऊ केलेले घ्यायलाही इन्कार केला. शेवटी विजयाबाईंना आई म्हणाली, 'शकुनाची पाच भांडी तरी मला देऊ द्या.' विजयाबाई म्हणाल्या 'ठेवायला जागा नाही, जावयाने मोठं घर बांधलं म्हणजे घेऊन जाईन.'

अठ्ठ्याहत्तर साली वकिलीसाठी मुंबईत जायचं मी ठरवलं. माझा धाकटा भाऊ बाळासाहेब न्यायाधीश म्हणून पूर्वीपासूनच नोकरीत होता; त्यामुळे तो परगावीच असे. आम्ही दोघेही मुला-बाळांसह बीडच्या बाहेर गेल्यामुळे बंगल्यात आई आणि काका दोघेच उरणार होते.

माझी मधली मुलगी- मेघना मात्र मी आजी-आजोबाजवळ राहते म्हणून बीडला राहू लागली. त्यांनाही सोबत झाली. आमच्या खूप मोठ्या आवारात बंगल्यासाठीचा चबुतराही काकांनी खूप मोठा बांधला होता. त्यावर निम्म्याच भागात बांधकाम झाले होते. जेवढे बांधले होते त्यातही आठ मोठमोठ्या खोल्या होत्या. चबुतऱ्याच्या न बांधलेल्या भागावर पत्र्याची खोली बांधून त्यात माझ्या भावाचा एक मित्र आणि त्याचा भाऊ शिकायला राहत असत. त्यांना भाकरी करून घालण्यासाठी त्यांची आजी तेथे राहायची. पाच फुटाचा चबुतरा उतरून खाली मागे

गेले म्हणजे नहाणी. बाहेरच उघड्या जागेवर एका चुलीवर पाणी गरम करावयाचे. मागच्या परसात एक जांभळीचे झाड, दोन जांबाची झाडे, एक-दोन साध्या बोरी आणि एक काशीबोर होती. आईने एक हौसेने लावलेले पारिजातकाचे झाडही होते. काशीबोरे आईला आवडत म्हणून त्याचे कलम मुद्दाम करून घेतले होते. जांब (म्हणजे पेरू) हे आईचे आवडीचे फळ. अगदी शेवटी दाताच्या फटी वाढल्या आणि जांबाच्या बिया त्यात अडकू लागल्या म्हणून तिने जांब खाणे बंद केले. जांब आणि आंबा सोडून दुसरी फळे फारशी तिला आवडायची नाहीत. तिला थोडेही वेगळे काही खाण्यात आले तर पित्त होई. तिचे पित्त हा एक अनाकलनीय प्रकार असे. आयुष्यभर या पित्ताने आईची पाठ धरली होती. साधारणत: सर्वांच्या खाण्यात येणाऱ्या बऱ्याच अगदी नेहमीच्या वस्तूनेही तिला पित्त होई. अर्धा लाडू खाल्ला तरी मला ढवळते असे ती म्हणे. त्यातले शारीरिक किती आणि मानसिक किती कोण जाणे! खाल्लेच नाही तर तिला जास्त त्रास होईल असे आम्हाला वाटे तर तिला मात्र आपल्याला त्रास होऊ नये म्हणून आपण कमीच खावे असे वाटे.

भल्यामोठ्या बंगल्यात आई अगदी सहजतेने वावरायची. सकाळी आमचा दूधवाला हरिभाऊ शेजारच्या गावावरून बीडला दूध विकायला यायचा. आमच्याच बंगल्यातल्या समोरच्या नळाचे पाणी दुधात घालून मग ते गावात विकायला न्यायचा. आईला कधी निवडण्या-टिपण्याला मदत हवी असेल तर ती हरिभाऊला निरोप द्यायची की हौसाबाईला (हरिभाऊची बायको) पाठव. मग दुसऱ्या दिवशी हौसाबाई मदतीला यायच्या. भरडासाठी थोडी दाळ दळायची असेल किंवा इतर काही जात्यातून काढायचे असेल तर त्यासाठी हौसाबाई लागायच्या.

संध्याकाळ झाली आणि काका फिरायला गेले म्हणजे बंगल्याच्या मोठ्या पायऱ्यावर आई भाजी निवडत बसायची. गावात राहणारी माझी चुलतबहीण सुमन आमच्या घरासमोरच्या गल्लीत असणाऱ्या वाचनालयात पुस्तक बदलायला यायची. पुस्तक बदलून घेतले की परत जाताना ती रमाकाकींच्याजवळ (आईजवळ) थोडावेळ बसायची. थोड्याफार इकडच्यातिकडच्या गप्पा झाल्या म्हणजे सुमनच्या हातातल्या पुस्तकाबद्दल बोलणे निघायचे. एखादी कादंबरी किंवा गोष्टींचे पुस्तक असले तर आई त्यात फारसे लक्ष घालायची नाही; पण एखाद्या स्त्रीने लिहिलेले आत्मचरित्र किंवा काही वेगळे पुस्तक असले तर त्याविषयी त्यांच्या गप्पा सुरू होत. दुर्गा भागवतांचे ‘व्यासपर्व’, रमाबाई रानड्यांच्या ‘आमच्या आयुष्यातील आठवणी’, लक्ष्मीबाई टिळकांची ‘स्मृतिचित्रे’ अशी काही पुस्तके तिच्या कायम आठवणीत असत. माझे एक इंग्रजी पुस्तक मी तिला अर्पण केले आहे. तिला प्रत देऊन नमस्कार केला तेव्हा तिने अर्पणपत्रिकेचे पान वाचले आणि म्हणाली, ‘मराठी असते तर पुस्तक वाचले असते.’ दुपारी तीन-चारच्या सुमाराला आई कधीमधी गावात राममंदिरात किंवा दत्त मंदिरात जाई. भजनात थोडावेळ बसे पण तिला त्यात फारसा रस नसे. तिच्यादृष्टीने महत्त्वाचे म्हणजे तेथे इतर बायकांच्या भेटी होत. देवळात गेली तरी देवाला नमस्कार केला आणि बरोबर आणलेले फुलपात्रातले धान्य तेथे ठेवले की लगेच ती परत फिरे.

आम्ही वैष्णव. उडपीच्या उत्तरादिमठाचे अनुयायी. वैष्णवांचे सोवळे फार कडक. पाच-दहा वर्षांनी मध्वाचार्य गावोगाव फिरत आणि आपल्या पंथातील लोकांना तप्तमुद्रा देत. शंखचक्रासारखी चिन्हे असलेल्या तांब्याच्या मुद्रिकेने ती तापवून अंगावर मुद्रा उमटवीत असत. मुद्रा घेणारा त्यामुळे पवित्र झाला असा समज. आमच्या घरात सोवळी आजी, अस्पृश्यताही न मानणारे वडील आणि तारतम्यानेच देवधर्म करणारी आई. यामुळे कर्मठ आचारधर्माला स्थान मिळालेच नाही. मध्वाचार्यांची पाद्यपूजाही आमच्या घरात पुढाकार घेऊन कधी झालीच नाही. मध्वाचार्यांनी अधिकारपत्र दिलेल्या शेषाचार्य अनवणे या सेवानिवृत्त महसूल अधिकाऱ्यांनी एक मठ आणि त्याला जोडून राममंदिर स्थापन केले होते. कोतवालगल्लीतले राममंदिर मध्वाराममंदिर म्हणून ओळखले जाई. तेथे आई अधूनमधून जाई. या मंदिरात राहणारी मंडळी आईला विशेष आदराने वागवीत.

आई देवळात जात असली तरी कोण्या बुवाबिवावर तिची अजिबात श्रद्धा नसे. जेथे बुवांना प्राधान्य असेल तेथे ती जातच नसे. देवाची पूजा किंवा उपासनासुद्धा कशी व कितीवेळ करावी याचे तारतम्य हवे असे तिला वाटे. माझा एक भाचा डॉक्टर झाला; कधी माझ्या घरी आला म्हणजे दोन-दोन तास पूजा करीत बसे. त्याला ती रागवत असे. 'रोग्यांना तपास, दोन-दोन तास पूजा काय करीत बसतोस? पाच मिनिटात पूजा केली तर देवाला पावत नाही काय?' असे ती त्याला विचारी. नवरात्र, गणेश चतुर्थी, लक्ष्मीपूजन अशावेळी घरच्या देवांची पूजा झालीच पाहिजे असे मात्र तिला वाटे; परंतु त्यातही अमूकच पद्धतीने ती व्हावी अगर अमक्यानेच ती करावी याबद्दल तिचा आग्रह नसे.

आई देवाच्या पारण्याचा किंवा श्रावणातल्या शुक्रवारचा स्वयंपाक सोवळ्यात व्हावा असा आग्रह धरायची. होत होते तोपर्यंत पारण्यातल्या जेवणा-नैवेद्यसाठी लागणारे शेवयासारखे पदार्थ ती स्वत: सोवळ्यात करून ठेवायची. दरवर्षी कुरडया-पापड्या घालायची. कढत चिकाचे भले मोठे भांडे गच्चीवर न्यायचे आणि तळपत्या उन्हात कुरडया-पापड्या घालायच्या हे एक दिव्यच असे. शिवाय आईने चीक खायला द्यावा म्हणून जवळपास घुटमळणाऱ्या आम्हा पोरांनी सोवळ्याला हात लावू नये याची काळजी घ्यावी लागे. सोवळ्यात काम करावे लागणारी माणसे त्यांना होणाऱ्या त्रासामुळे कावलेली असतात; पण आई मात्र आमच्यावर कधी वसकली असे आठवत नाही. सोवळेओवळे पाळणाऱ्या मंडळीत बहुतेक वेळा आढळणारा तो दुर्गुण तिच्या बाबतीत मात्र गैरहजर होता.

बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची एक विलक्षण शक्ती तिच्यात होती. नातवंडांचा तर तिच्यावर आणि काकावर जबरदस्त विश्वास. माझ्या एका भाच्याने सिंधी मुलीशी लग्न करण्याचे ठरवले. हे लग्न झाले तेव्हा ही बातमी तिला कशी सांगावी या चिंतेत आम्ही होतो. शेवटी हिंमत करून सांगितली तेव्हा ती हसून म्हणाली, "अरे, हे तर मला पूर्वीच माहीत होते. त्याच्याच वर्गात होती ना ती मुलगी? तिच्याशी तो लग्न करणार आहे हे त्याने मला मागेच सांगितले होते." माझ्या मुलीने- मेघनाने- मराठा जातीतील मुलाशी लग्न केले. आमच्याकडे सणावारी ब्राह्मण व सवाष्ण म्हणून ते दोघे तिला चालत. माझ्या मुलानेही मराठा जातीतील त्याच्या मैत्रिणीशी लग्न केले. आमच्या देवाची पूजा कुळाचाराच्या दिवशी तिने केलेली आईला चालायची; नव्हे, तिनेच ती करावी असा तिचा आग्रह असे. मेघना कधी चेष्टेने तिला म्हणाली की 'आता हे कसे तुला चालते?' तेव्हा ती म्हणायची, "अग, ती आपल्या घरी आली म्हणजे आपलीच नाही का झाली?"

चपळगावकर कुटुंबात काका वयाने सर्वात मोठे. त्यांचा स्वभाव आणि सर्वांना योग्य सल्लाच देण्याची सवय यामुळे वयाने फक्त पाच-दहा वर्षांनी लहान असलेल्या पुतण्यांनाही त्यांच्याबद्दल खूप आधार वाटे. आई तर सर्वांचीच 'रमाकाकी.' ते आधार आणि सल्ला यांचे स्थान. आपण कुटुंबातले वडील आहोत या जाणीवेने येणारी जबाबदारी ती कधी विसरायची नाही. इतरांनी आपल्याला विशेष मान दिला की नाही याकडे तिचे लक्ष नसे; पण आपण कसे वागायला पाहिजे याचे मात्र तिला सतत भान असे. मी, माझा भाऊ, बहीण अगर आमची मुले यांच्यापैकी कोणाच्याही घरी नवीन बाळ जन्माला आले तर त्याच्यासाठी मनगट्या आईच तयार करवून घेऊन पाठवणार हे आमच्या घराच्या अंगवळणी पडलेले होते. माझी पुतणी नागपूरला असते. तिला मुलगा झाल्यावर तिने 'तू मनगट्या कधी पाठवणार?' असा आजीला निरोप केला.

बीडला असताना ती नियमाने दोन-तीन दिवसांनी भाजीमंडईत जायची. मेघना तेथे होती तेव्हा ती, इतरवेळी दुधवाले हरिभाऊ किंवा घरकामाला आमच्याकडे येणारी निता किंवा इतर कोणी बरोबर घ्यायचे. भाज्या आणि फळे याबद्दल ती फार चोखंदळ होती. बालपण मुंबईत गेले होते. नंतर मामा चंद्रपूरला आणि नाशिकला होते. तेथेही खूप भाज्या मिळत. फुलकोबी, पानकोबी यासारख्या भाज्या मराठवाड्यात खूप नव्या होत्या. कडव्या वालाची

उसळ कोकणस्थ मंडळी वगळली तर आमच्याच घरी व्हायची. आईच्या स्वयंपाकात तिखट कमी असे आणि गूळ आणि नारळ यांचा वापर मराठवाड्याच्या मानाने थोडा अधिक असे. लाल भोपळ्याची भाजी आणि वांगेभात हे तिचे आवडीचे पदार्थ.

खूपच पित्त होऊ लागले तेव्हा एका वैद्यांनी तिला कॉफी पिऊ नका, त्याऐवजी चहा घ्या असा सल्ला दिला. पन्नास-साठ वर्षांची कॉफीची सवय सोडून देऊन मग तिने पुन्हा चहा घ्यायला प्रारंभ केला होता. कधी कधी दुपारच्या वेळी राजगिऱ्याच्या पीठाचे छोटे चांदके ती करायची. कधी फुरसत असेल तर दोन- चार गूळपापडीचे लाडू. खाण्यात चोखंदळपणा असला तरी खाणे मात्र अगदीच थोडे. तब्येतच तोळामासा. तिला लागणार तरी किती? शेवटी शेवटी तर एखादा पदार्थ दोन- तीन चमचे वाटीत आणला तरी ‘अबब केवढा आणलास,एवढा जाणार नाही. निम्मा करून आण’ असे ती सांगायची. ती जाण्यापूर्वी पाच- सहा महिने एकदा सहज गंमतीने ‘तू गूळपापडीचे लाडू बऱ्याच दिवसात केले नाहीस. इतरांना ते तसे करता येत नाहीत.’ असे मी म्हणालो. केवळ गंमत म्हणून मी बोललो होतो. बाहेर जाऊन घरी परत आलो तर आईने धडपड करीत स्वयंपाकघरात जाऊन गूळपापडीचे तीन लाडू केले होते. बऱ्याच दिवसांनी मी गूळपापडीचा लाडू खात होतो. लाडू तर छानच होते; पण माझे डोळे मात्र भरून येत होते.

मी मुंबईत आणि धाकटा भाऊ बाळासाहेब नोकरीच्या गावी राहू लागलो. सोबतीला आजी-आजोबाजवळ राहिलेली मेघनाही सुमारे दीड वर्षांनी मुंबईला माझ्याजवळ आली. काका आणि आई हे दोघेच बीडला उरले. सहजीवनाची एक वेगळीच घनिष्ठता सांगणारे पर्व दोघांच्या आयुष्यात सुरू झाले. आईसाठी तर काका हेच जगण्याचे एकमेव प्रयोजन बनले. संसाराला पंचेचाळीस वर्षे होऊन गेली होती. सुख-दु:खाच्या अनेक परी दोघांनी पाहिल्या होत्या. दोघांच्याही गरजा अगोदरपासूनच कमी होत्या. त्यांचे खाणेपिणे अगदीच मोजके. आता तर ते आणखीच कमी झाले होते. काका जे समोर आले ते गुपचूप खाणाऱ्यांच्या पंथातले. कसलीच आवड-निवड त्यांना नसे आणि काही असलीच तर ती ते सांगत नसत. घरातल्या गृहिणीच्या कष्टाचा अवमान करू नये असे ते मानत. त्यांच्या सहनशीलतेबद्दलच त्यांना आईची बोलणीही बसत. भाजीत मीठ नसले किंवा खूपच जास्त असले तरी काका त्यांचे जेवण संपेपर्यंत अक्षरही बोलत नसत. नंतर आई जेवायला बसली म्हणजे तिच्या ते लक्षात येई. ‘भाजीत मीठ जास्त झालं होतं तर खाल्ली कशाला?’ किंवा ‘भाजीत मीठ नव्हतं तर शेजारीच पानात होतं ते का नाही घेतलं?’ असं ती काकांना रागवावयाची. काकांना काय आवडते,काय चालते हे थोडे अनुभवाने, थोडे अंदाजाने ती ठरवावयाची. त्यांचे सगळे वेळेवर करण्यात तिचा दिवस जायचा. आईच्या अशा दक्षसेवेमुळे काका तिच्यावर संपूर्णपणे अवलंबून राहू लागले. आईने सांगितले नाही तर चहा-जेवणाचीसुद्धा त्यांना आठवण होत नसे. ‘स्वत:हून एक कामसुद्धा मनाने करीत नाहीत’ अशी आई नेहमी तक्रार करायची. पण ही तक्रार एखाद्या लहान मुलाची त्याच्या आईने कौतुकाने करावी तशी असे. या काळात आई काकांचीसुद्धा आईच झालेली होती. काका सुधारावे, म्हणजे त्यांनी वेळच्यावेळी स्वत:हून आपली औषधे घ्यावीत, जेवण-चहा मागावा, न सांगता आंघोळ करावी अशी तिची खरोखरच अपेक्षा असेल असे मात्र मला वाटत नाही. अन् काका खरेच तसे सुधारले असते तर मग आईने काय केले असते? सात-आठ वर्षांनी ते दोघे माझ्याकडे राहायला औरंगाबादला आले तेव्हा तर माझ्याकडे पुरेसे नोकर-चाकर होते. पण काकांना पिण्याला पाणी हवे असले तरी आई ते काम दुसऱ्याला सांगायची नाही. स्वत:च त्यांना पाणी नेऊन द्यायची. काकांचे सगळेच काम आपणच करायचे असा तिचा आग्रह असे.

आई वयोमानानुसार आता थकत चालली होती. काका तिच्या तब्येतीची काळजी करत; पण त्यांचे तिच्यावर अवलंबून राहणे त्यांच्या इतके अंगवळणी पडले होते की ते कमी होत नव्हते. ते आईवर नुसते अवलंबून नसत तर

आईच्या आज्ञेतही असत. नंदिनीने - सुनेने किंवा एखाद्या नातीने काही नवा खाद्यपदार्थ केला व तो काकांना खा म्हटले तर ‘तिला (आईला) विचार’ असे ते सांगायचे. आईने परवानगी दिली तरच तो पदार्थ व तोही ती म्हणेल तेवढा खायचा. आम्ही कोणी गावाला निघालेले असू किंवा गावातल्याच एका भावाच्या घरून दुसऱ्या भावाच्या घरी जात असलो आणि काकांना ‘निघतो’ किंवा ‘येतो मी’ असे म्हटले तर काका लगेच ‘अरे, तिला सांगून जा’ असे म्हणायचे. काका आईला विलक्षण आदराने वागवत. तिचा त्यांनी कधी अपमान केला अगर ते तिला लागट बोलले असे कधी घडलेच नाही. आर्थिक समृद्धीच्या शक्यतेकडे पाठ फिरवून जे आयुष्य आपण जगलो त्यात मनापासून साथ देताना आईने खाल्ल्या खस्तांची आठवण त्यांच्या मनात सतत असावी. स्वत:चा आजार किंवा आलेली संकटे यांच्यामुळे किंचितही विचलित न होणारे काका आई आजारी पडली म्हणजे मात्र विलक्षण अस्वस्थ होत. डॉक्टरांनी काय सांगितले याची आमच्याजवळ पुन:पुन्हा चौकशी करीत. तिला दवाखान्यात दाखल केले तर तिला पाहून येणाऱ्या प्रत्येकाला तिच्या प्रकृतीबद्दल विचारत. त्यांचा आवाज कातर होई.

काका गेले तेव्हा पाच-दहा मिनिटे तिने हुंदके दिले आणि अश्रूंना वाट करून दिली. नंतर ती लगेच सावरली. काका तर सतत आठवणीत कायमच होते. असेच एकदा काकांच्या आठवणी ती मला सांगत होती. अचानक तिच्या डोळ्यात पाणी जमा झाले. भरल्या गळ्याने म्हणाली, ‘वय झालं होतं.’ आणि नंतर एकदम गप्प झाली. ती रडली असे दोन-तीनच प्रसंग माझ्या लक्षात आहेत. मामा गेल्याचे कळवणारे पोस्टकार्ड आले तेव्हा आणि नंतर तिचा जावई कालिदास अचानक हृदयविकाराचा झटक्याने गेला तेव्हा. तसाच शोक तिने केला तो माझ्या धाकट्या भावाची- बाळासाहेबाची- पत्नी सुरुची वारली त्यावेळी. अवघ्या महिन्याभरात यकृताचा कर्करोग बळावून सुरुची गेली. हा आईला प्रचंड धक्का होता. चार-पाच वर्षे ती आणि काका बाळासाहेबांकडे राहत होते. आता तुम्ही माझ्याकडे राहायला चला असे मी त्यांना सुचवले तेव्हा आईने नकार दिला. बाळासाहेबाकडे कोणी प्रौढ बाईमाणूस नाही, त्यांच्या घरात आता सून यायची आहे. आपण तेथेच असले पाहिजे असे तिच्या मनात होते. काका गेल्यावर आणि शैलेशचे लग्न झाल्यानंतर मग ती माझ्याकडे राहायला आली.

काका गेल्यानंतर आई अधिक थकत चालली. एकदा हॉलमध्ये दिवाणावर ती बसली होती. स्वयंपाकघरात कोणीतरी काम करत होते. ते पाहण्यासाठी व तिच्याशी बोलण्यासाठी ती अर्धवट उठून वाकली आणि त्यातच तिचा तोल जाऊन पडली. आणखी एका मणक्याला फ्रॅक्चर झाले. भाजीमंडईत मोकाट फिरणाऱ्या एका गायीने तिच्या पाठीला पंधरा-वीस वर्षांपूर्वी धडक देऊन एक मणका अगोदरच जायबंदी केला होता. थोड्याच दिवसांनी तिच्या खोलीत कॉटवरवरून उठताना झोक जाऊन ती पडली आणि कंबरही दुखावली. लागोपाठ झालेल्या या दोन आघातांनी तिचे घरातल्या घरात फिरणेही बंद झाले. रात्री मदतीला लागले तर असावे म्हणून एक बाई झोपायला येऊ लागल्या. हालचालीबरोबरच खाणेही कमी झाले. तिची मुंबई- पुण्यात असलेली नातवंडे तिला भेटून जाऊ लागली. आपण आता नव्वदीच्या पुढे गेलो आहोत, केव्हातरी हे सगळे संपणार आहे याची तिला जाणीव होती. मात्र भीती किंवा दु:ख कशाचेच नव्हते. तिची आवराआवर मात्र सुरू झाली होती. भक्ती एकदा भेटायला आली तेव्हा तिने आपली जुनी नथ कपाटातून नंदिनीला काढायला लावून तिला दिली. भक्ती शाळेत असताना एका कार्यक्रमात भक्तीने घातलेली नथ तिला किती चांगली दिसत होती याची आठवणही तिने काढली. माझ्या चुलतभावाची मुलगी मंजिरी हिचे लग्न झाले त्याच दिवशी तिला घरी बोलावण्याचा आग्रह तिने धरला. ‘माझी तब्येत बरी नाही, तिला आजच बोलवा’ असे तिने सांगितले होते. ती आली आणि नंतर बोलावण्याचे कारण आम्हाला कळाले. मंजिरीला ती सोन्याचे गोठ देऊ इच्छित होती. ते तिने दिले आणि आशीर्वाद देऊन निरोप दिला.

आमच्या घरात आई- काकासाठी होणारी बिस्किटे हा एक समारंभ असे. बाजारात मिळणारी मैद्याची बिस्किटे खाऊ नयेत असे आईने ठरवले होते. वनस्पती तूप हाही तिच्यासाठी एक निषिद्ध पदार्थ होता. खूप वर्षांपूर्वी आईने नाशिकहून एक बिस्किटपात्र आणले होते. जाड लोखंडी पत्र्याच्या या पात्रात होणारी बिस्किटे बीडमध्ये तरी केवळ आमच्याच घरी होत असावी. आता ती बिस्किटे पुन्हा तयार होऊ लागली. आता चुलीवरसुद्धा वापरता येणाऱ्या त्या पात्राऐवजी घरी आलेला ओव्हन वापरला जात होता. मात्र आईला आता होत नसल्यामुळे पूर्वी आमच्या घरी काम केलेल्या तिच्या विश्वासातील इंदुबाई किंवा बेबी असे कोणीतरी निरोप गेल्यावर मुद्दाम येई. आदल्या दिवशी देशमान्यांनी लोणी आणून ठेवलेले असे. दळलेली साखर तयार असे. बिस्किटे तयार झाली म्हणजे त्यातील दोन-तीन काढून ती एका छोट्या बरणीत आपल्या कॉटजवळ ठेवायची. पुढे ती चावताही येईनात तेव्हा ती खलबत्त्यात कुटून चहाबरोबर घ्यायची. वैद्यकीय सल्ल्यामुळे मला तूप-लोणी खावयाचे नव्हते. हा वैद्यकीय सल्ला माझ्यापेक्षा तिनेच जास्त गांभीर्याने घेतला होता. व ती माझ्या हातावर अर्धेच बिस्कीट ठेवत असे. इंदुबाई किंवा बेबी परत जाऊ लागल्या म्हणजे ती त्यांच्या हातावर पन्नास-शंभर रुपये ठेवी. दोन चमचे भात, नितकोर भाकरी किंवा पोळी आणि लालभोपळ्याची किंवा दुसरी कसलीतरी भाजी एवढेच सकाळी आणि रात्री फोडणी दिलेल्या लाह्याच्या पीठाचे एक-दोनच घास एवढ्याच उरलेल्या तिच्या आहाराला चहाबरोबरचे हे घरचे बिस्कीट हा मोठाच आधार असे.

कोणते काम कोणी करावे याबद्दल तिचे काही शास्त्र होते. सोनाराकडे जाऊन मनगट्या करून आणायच्या असतील अगर बाजारातून काळी पोत, फणी अगर असले काही आणायचे असेल तर मेघनाला निरोप जायचा. औषध आणायचं असेल तर देशमाने लागायचा. डॉक्टरला घरी बोलवायचे असेल तर मी किंवा बाळासाहेब. घरातले इतर काही काम असेल तर नंदिनी. नंदिनीचा आणि तिचा दीर्घ सहवास. मोठी सून म्हणून काही गोष्टी तिने केल्याच पाहिजेत असाही ती आग्रह धरायची; पण सगळीच कामे मात्र तिला ती करू द्यायची नाही. शेवटच्या काही दिवसांत तिला बेडपॅन द्यावे लागले, तेव्हा ते स्वच्छ करण्याचे काम दोन-तीन वेळा नंदिनीने केले. आईने मला बोलावून सांगितले की 'हे काम मुलानेच केले पाहिजे, सुनेने नाही. तू नंदिनीला हे काम करायला लावू नकोस.' 'मी तुमची मुलगीच आहे' असे नंदिनीने सांगून पाहिले पण तिचे मत बदलले नाही.

अशक्तता खूप वाढल्यामुळे आई तिच्या खोलीत कॉटवर पडून असे; मात्र मधेच अचानक तिला काही तरी आठवे आणि ती मला बोलावून विचारी. एखाद्या गाण्यातील किंवा पदातील मधलीच एखादी ओळ तिला आठवत असे आणि नंतरची ओळ तिला हवी असे. महाभारतातील एखादी व्यक्ती कोणाचा मुलगा अगर कोणाचा भाऊ हे तिला हवे असे. माझ्या अपुऱ्या अभ्यासाचे वाण अशावेळी उघडे पडे.

कंबरेचे हाड दुखावल्यामुळे नऊवारी साडी नेसणे, खरे म्हणजे तिला नेसवणे अवघड झाले. गाऊन घालणे सोयीचे होते; पण तिने तो घालण्याला नकार दिला. शेवटचे आठ-दहा दिवस नंदिनीने बरेच समजावल्यामुळे तिने गाऊन घातला. त्वचा एवढी हुळहुळी झाली होती की कोठेही थोडे लागले किंवा घासले तरी तो भाग एकदम काळा व्हायचा. एके दिवशी हातातल्या पाटल्या तिने काढून नंदिनीजवळ दिल्या. 'तुम्ही कशाकरता या काढून दिल्या' असे विचारल्यावर हाताला घासतात असे कारण आईने सांगितले. पण तीन-चार दिवसांनी गळ्यातील लहान मणी असलेली माळही तिने काढून दिली. आमच्या कुटुंबाशी जुना स्नेह असलेल्या सदानंद वैद्यांच्या मुलीचे लग्न महिनाभरापूर्वीच झाले होते. लग्न आटोपल्यानंतर त्यांनी एक नऊवारी सुताची पण मऊ साडी अहेर म्हणून आईला दिली होती. ती साडी कुठे ठेवली आहे असे तिने दोनतीन वेळा नंदिनीला विचारले. कामाच्या गडबडीत ती साडी आईला काढून लगेच देणे झाले नव्हते. साडी नेसणे अवघड असताना साडी पाहण्याचा व जवळ ठेवण्याचा हट्ट कशाकरता असा विचार आमच्या मनात येत होता. खूप वय झाल्यावर हट्टीपणा थोडा वाढतो. तसे काही असावे

असे आम्हाला वाटून गेले. मी उद्या साडी काढून देते असे नंदिनीने सांगितले तरी तिने मेघना भेटायला आली तेव्हा तिला आताच साडी शोधून काढ असा आग्रह धरला. वैद्यांनी दिलेली ती साडी मेघनाने शोधून तिच्या हातात दिली. जवळ कोणी नाही हे पाहून आई मेघनाला म्हणाली, ‘मी जाईन तेव्हा माझ्या अंगावर गाऊन नसावा. हीच साडी मला नेसवायची.’

शेवटचे काही दिवस ती पोटात दुखते म्हणून तक्रार करावयाची. सोनोग्राफीसह सगळ्या तपासण्या झाल्या होत्या. काहीच सापडत नव्हते. वेदना दाबून टाकणारी औषधे तरी किती द्यायची? म्हणून रोज तिला आम्ही बी कॉम्प्लेक्सची एक गोळी देऊ लागलो. त्याने तिला बरेही वाटू लागले. परंतु तो उपाय काही खरा नव्हता. पोट दुखते म्हणून ती दोन दिवस कळवळत होती. थोडावेळ गेला म्हणजे ते दुखणे कमी होई. डॉक्टरांनी ॲण्टीबायोटिक सुरू केले. पण त्याचा परिणाम व्हायला वेळ लागणार होता. तोपर्यंत तिच्या शरीराने तग धरावयाला हवी होती.

दुसऱ्या दिवशी पहाटे माझ्या मनात आलं आज सकाळचा चहा आपणच करून द्यावा. दोनतीन दिवस सोबतीला येणाऱ्या बाईच तिचा चहा करीत होत्या. मी चहा करू का असे मी विचारले ती ‘कर, पण थोडाच कर’ असे म्हणाली. चहा घेतल्यावर तिने ‘चांगला केला होतास’ असे प्रशस्तीपत्रही दिले. नंतर दुपारी पोट दुखतयं म्हणून ती मोठ्याने विव्हळत तक्रार करू लागली. अंगात त्राणच नसताना जोरात ओरडण्याने आणखी शक्ती कमी होईल म्हणून ‘थोडे सहन कर, पुन्हा पुन्हा सांगून काय करणार?’ असे मी म्हणालो. तिला ऐकू येत नसल्यामुळे साहजिकच माझा आवाज थोडासा वाढलेला होता. तिला मी वेदनाशामकही दिले. दुखणे कमी झाले असेल अगर तिने सहन करण्याचे ठरवले असेल, पण ती थोडी शांत झाली. पोट दुखणे कमी व्हावे म्हणून काही आयुर्वेदिक औषध देता येईल का हे विचारण्यासाठी एका वैद्याकडे मी गेलो. मी औषध घेऊन परत येत असतानाच मेघनाचा फोन आला ‘कुठे आहात? घरी केव्हा येणार आहात? असे ती विचारीत होती. मी घरी यायला निघालोच होतो.

घरी आलो तेव्हा नंदिनी, बाळासाहेब, मेघना, श्रीधर, शैलेश, निताशा सगळेच आईच्या कॉटभोवती जमले होते. आई हळू आवाजात पण स्पष्ट बोलत होती. मीही तेथेच बसलो. मी, बाळासाहेब किंवा नंदिनी तिचा हात हातात धरून ठेवत होतो. शेजारी कोण कोण आहेत हे ती इकडेतिकडे नजर फिरवीत पाहत होती. मेघना आणि बाळासाहेब आम्ही सगळे आहोत हे नावे घेऊन सांगत होते. तिच्या नजरेतले तेज हळूहळू कमी होते आहे हे दिसत होते. शब्दही उच्चारणे तिला कठीण होऊ लागले. तिने ‘पा’ अक्षर दोन वेळा उच्चारल्यावर तिला पाणी हवे आहे हे कळाले. मी चमच्याने तिच्या तोंडात पाणी घातले. तिने घोटही घेतला पण थोडेसे पाणी ओठातून हनुवटीवर ओघळले होते. आईने उशाजवळच ठेवलेला रूमाल हाताने घेतला आणि त्याने ते बाहेर आलेले पाणी टिपले. श्वास मंद होत चालला होता. रात्री साडेनऊच्या सुमाराला तो पूर्ण थांबला. आम्ही सगळ्यांनीच स्वत:ला आवरले होते. जे घडले ते अनपेक्षित म्हणता येणार नव्हते. आईचं वय ९३ होतं. मलाही एकाहत्तर झाले होते. जनरीतीप्रमाणे सांगायच तर ‘तिचं वय झालं होतं.’

आई गेल्यानंतर आलेल्या पत्रातलं एक पत्र अनुपमा उजगऱ्यांचं होतं. निरंजन उजगऱ्यांनी अनुवाद केलेली मामेद इब्रागीम नावाच्या रशियन कवीची एक कविता अनुपमाताईंनी पत्रात उद्धत केली होती.

*“आई गेल्याच्या दु:खाचं*
*तिच्या वयाशी नातं नसतं*
*आपली आई जाते तेव्हा*
*तिचं वय आईचं असतं.”*

***